RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक ४९] मंगळवार, एप्रिल २०, २०२१/चैत्र ३०, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १११**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वित्त विभाग**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० एप्रिल २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक मूवक. १५२१/प्र.क्र. ३९/कराधान-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री झाली आहे की, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये तात्काळ सुधारणा करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) च्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकानुसार सदर नियमांना पूर्व प्रसिद्धी देण्याची अट पाळण्याची गरज नाही ;

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ८३ च्या पोट-कलम (४) च्या परंतुकासह पोट-कलमे (१) आणि (२) च्या शक्तींचा वापर करून तसेच यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ मध्ये खालील सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

१. या नियमांना महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) नियम, २०२१ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ (यापुढे "मुख्य नियम" असे संबोधण्यात येईल), च्या नियम १७ मध्ये, उप-नियम (४ख) मध्ये, खंड (क) मध्ये, परंतुका ऐवजी खालील परंतुक दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"परंतु, सन २०१९-२० आणि २०२०-२१ या वर्षांचे वार्षिक विवरण ३० जून २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी दाखल करावे ".

३. मुख्य नियमांच्या नियम ४१ मध्ये, उप-नियम (१) मध्ये,—

(क) दुसऱ्या परंतुका मध्ये, "खंड (क), (ख)" या शब्द, कंस आणि अक्षरां ऐवजी "खंड (ख)" हे शब्द, कंस आणि अक्षर दाखल करण्यात येत आहेत;

(ख) दुसऱ्या परंतुका नंतर खालील परंतुक दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"परंतु असे सुद्धा की, व्यापारी ज्यास नियम १७ च्या उप-नियम (४ख) च्या खंड (क) च्या परंतुकानुसार विवरण दाखल करणे आवश्यक असेल, तो ३१ मार्च २०२० आणि ३१ मार्च २०२१ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी कराच्या रक्कमेचा भरणा शासकीय कोषागारात ३० जून २०२१ रोजी किंवा त्यापूर्वी करील ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मंदार केळकर,**
शासनाचे उप सचिव.

**FINANCE DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 20th April 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. VAT-1521 / CR- 39 / Taxation-1.—Whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005 and to dispense with the condition of previous publication thereof under the proviso to sub-section *(4)* of section 83 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(2)* read with the proviso to sub-section *(4)* of section 83 of the said Act, and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules further to amend the Maharashtra Value Added Tax Rules, 2005, namely :—

**1.** These rules may be called the Maharashtra Value Added Tax (Amendment) Rules, 2021.

**2.** In rule 17 of the Maharashtra Value Added Tax Rules, 2005 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule *(4B)*, in clause *(a)* for the proviso, the following proviso shall be substituted, namely :—

"Provided that, for the year 2019-20 and 2020-21 annual return shall be filed on or before the 30th June 2021;".

**3.** In rule 41 of the principal Rules, in sub-rule *(1)*,—

*(a)* in the second proviso, for the word, brackets and letters "clause *(a),(b)*" the word, brackets and letter "clauses *(b)*" shall be substituted;

*(b)* after the second proviso the following proviso shall be inserted, namely :—

"Provided also that, the dealer, who is required to file the return as per proviso to clause *(a)* of sub-rule *(4B)* of rule 17, shall pay into Government Treasury, the amount of tax due from him for the period ended on the 31st March 2020 and the 31st March 2021, on or before the 30th day of June 2021".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANDAR KELKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.